# चौथे प्रकरण

## श्री.म.माटे यांचे व्यक्तित्व

# श्री.म.माटे यांचे व्यक्तित्व

दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणात अनुक्रमे 'उपेक्षितांचे अंतरंग' व 'माणुसकीचा गहिवर' या दोन्ही संग्रहातील कथांचा कथानक, व्यक्तिचित्रे, भाषा, वातावरण, संवाद या घटकांनुसार अभ्यास केल्यानंतर या प्रकरणात माट्यांचे कथासृष्टीतील वेगळेपण सांगण्यासाठी काही निष्कर्ष मांडावयाचे आहेत.

श्री.म.माट्यांपूर्वी वि.स.सुखटणकर, सरदेसाई कथालेखन करीत होते. त्यांच्या लेखनापेक्षा माट्यांच्या कथांचे वेगळेपण सांगण्यापूर्वी दोघांच्या लेखनाचे स्वरूप पाहणे आवश्यक वाटते.

ग्रामीण कथांची प्रेरणाच मुळी वास्तववादी अनुभूती ही आहे. ग्रामीण कथा विश्वाचा उगम म्हणून हरिभाऊंच्या 'काळ तर मोठा कठीण आला' कडे पहावे लागते. १८९७ मध्ये महाराष्ट्रात जो दुष्काळ पडला त्यामध्ये शेतकऱ्यांची जी वाताहत झाली त्याची कथा इथे सांगितली आहे. हरिभाऊंना प्रत्यक्ष या ग्रामीण जीवनाची माहिती नव्हती त्यामुळे केवळ सहानुभूतीने व घटनेने प्रभावित होऊन कथा लिहिल्याने ग्रामीण जीवनाच्या खास जाणिवा कथेत दिसत नाहीत.

## वि.स.सुखटणकर-

वि.स.सुखटणकरांनी ग्रामीण जीवनाविषयी वाङ्मयीन जाणिवा मराठी साहित्यात प्रथम निर्माण केल्या. १९३१ साली 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिध्द झाला. आजच्या व कालच्या गोमंतकाचे दर्शन त्यांनी या कथांतून घडविले आहे. गोव्यातील देवदासींची चाल, शेजारशेजारच्या गावातील वैर, वतनदार व गावकऱ्यांतील वैर, परकीयांसमोर लाचार होण्याची आपल्या माणसांची प्रवृत्ती यांचे चित्र त्यांच्या कथांत पहायला मिळते.

महाराष्ट्रीय जीवनात असलेला गांधीवादी प्रवृत्तीचा तसेच भारतात असलेल्या साम्यवादी व गांधीवादी प्रवृत्तीचा प्रभाव त्यांच्या लेखनावर आहे. सामाजिक व देशविषयक जाणिवा लोकमनात जागृत करण्यासाठीच त्यांनी आपल्या लेखनाचा उपयोग केला आहे. देवदासींचे जीवन सांगताना सामाजिक भान तर गावातील भांडणे चित्रित करताना ते ऐतिहासिक अभिमान जागृत करण्याचा प्रयत्न करतात. गावांगावांतील तंट्यांचे चित्र रेखाटताना हिंदु व ख्रिश्चन एक झाले पाहिजेत हा उद्देश त्यांना मानवी स्वभावदर्शनापेक्षा श्रेष्ठ वाटतो.

त्यांच्या कथांतील चित्रणावरून ग्रामीण माणसांच्या प्रवृत्ती कळतात व गोव्याच्या

निसर्गसमृध्द भूमीचे दर्शन घडते. ग्रामीण वाङ्मयाच्या संदर्भात त्यांचे हे कार्य पायाभूत स्वरूपाचे आहे.

### लक्ष्मणराव सरदेसाई-

१९४० मध्ये प्रकाशित झालेल्या 'ढासळलेले बुरूज' या कथासंग्रहातील कथांच्या अभ्यासावरून आपल्याला त्यांच्या लेखनाची कल्पना येईल. त्यांच्या या कथांचा प्रत्येक कथेनुसार आपण अभ्यास करू.

### मायेचा वारसा-

कुळाची पडित जमीन हेच आपले सर्वस्व समजून म्हातारा भटजी ती जमीन उपजावू करतो. किंबहुना या भूमीतच अधिकाधिक कष्ट करण्यासाठीच आपली बायकामुले असावीत असे त्याला वाटते. जमिनीची सेवा करता करताच या भटजीचा अंत होतो. त्यांनी मोठ्या कष्टाने उपजावू केलेल्या या जमिनीच्या मायेचा वारसा म्हणून कथेचा निवेदक सर्व जमिनी त्या भटजीच्या पश्चात त्याच्या मुलांना देतो.

या कथेतील सर्वच व्यक्ती भूमीवर अतिशय प्रेम करतात. आल्या गेल्या व्यक्तिंचा आदरसत्कार ही माणसे मायेने व आपलेपणाने करतात. पोफळीला पाणी देणे, पोफळी पाडणे, सुपारी तयार करणे ही कामे करतानाच त्यांच्या आयुष्याचे दिवस कसे जातात हे त्यांना कळत नाही. झाडांवर व जमिनीवर ही माणसे प्रेम करतात. त्यांची दु:खे समजून घेण्याचा प्रयत्न करतात.

### मोडलेला माड-

या कथेतील वसुंधरा नवऱ्याने अनीतीचे कोणतेही वर्तन केले नसताना नवऱ्यावर कुभांड रचून चंद्रा नायकीणीला घरी बोलावते व तिचा नवराही तेच खरे ठरवायचे अशा इर्ष्येला पेटतो. आपल्या मुलांना घेऊन चंद्रा नायकीणीच्या घरी जातो. अशी अतिशयोक्तीने भरलेली ही कथा आहे.

'प्रत्येक माणसात देव असतो अन् राक्षस पण असतो. पण देव झोपलेला असतो, अन् राक्षस मात्र सदैव जागृत असतो. देवाला जागृत ठेवण्याचे काम कठीण असतं' हे या कथेचे सार आहे. या कथेतील संपूर्ण वातावरण विलासी आहे. पुरूष मंडळी विलासी, व्यसनाधीन आहेत. रात्रीचे बाहेर जाणं, उशीरा परतणे हे सर्व प्रकार पुरूष मंडळी राजरोस करताना आढळतात.

### राण्यांचे ब्रीद-

एक रोमांचकारी अनुभव सांगणारी ही कथा आहे. बंडवाले गावकरी यांच्यात झालेला

संघर्ष या कथेत चित्रीत केलेला आहे. मरणाला तुच्छ लेखणारा पण दुसऱ्याचे त्रास पाहून कष्टणारा त्याचा स्वभाव आहे. बंदीवानाला सोडायचे झाले तरी तो देवतेला कौल लावतो.

### जरीचे पातळ-

दारावर विकायला येणारे तलम जरीचे वस्त्र, इंदिरेचा ते घेण्याचा आग्रह व त्यावरून जाग्या होणाऱ्या बाबासाहेबांच्या सर्व पूर्वस्मृती या कथेत व्यक्त झालेल्या आहेत. ते पातळ म्हणजेच त्यांच्या नाशाची कहाणी. आपल्या पत्नीचे ते पातळ बाबासाहेबांनी वेश्येला नेसायला दिले. वेश्येपायी त्यांनी हरएक पापे केली. चैत्री पौर्णिमेला नागेशीच्या मंदिरात बाबासाहेबांनी दिलेले ते पातळ त्यांच्या पत्नीने वेश्येच्या अंगावर पाहिले अन् एक महिन्यात तिने देह ठेवला.

स्त्रियांशी मनमोकळे बोलण्याची, आनंदाने प्रेमाने बोलण्याची पुरूष माणसांना गरज वाटत नसे. परस्त्रीच्या संगतीत रंगमहालात त्यांचे विलास चालत. औरस संतती लाभावी ह्या साठीच बायकोचा उपयोग. विवाहाचे पावित्र्य राखण्याचे बंधन पुरूषावर नव्हते. 'पण स्त्रियांना रडवून कुणी सुखी होत नाही. तिचे हास्य हीच सुखाची चिरंतन ज्योत' असा कथेचा शेवट केला आहे. या कथेत तत्वचर्चा भरपूर येते पण ती कुठेही उपरी वाटत नाही. ती त्या कथेचाच एक भाग बनते.

### गतकालचे पडसाद-

आई मुलाच्या वात्सल्याची ही कथा आहे. उद्योगधंद्याचे शास्त्रीय ज्ञान घेऊन काबाडकष्ट करून मुलगा शाम वडिलांचा व्यवसाय उर्जितावस्थेला आणतो. आपल्या मृत झालेल्या पित्यापासून पूर्वी आईला सोसावे लागणारे कष्ट, शारीरिक व मानसिक क्लेश, घराण्याची विपन्नावस्था यापासून आईला झालेला त्रास विसरून सुखाचे दिवस यावेत यासाठी शाम धडपड करतो. नव्या हुशारीने कामाला लागलेल्या शामचे चार हात व्हावेत यासाठी त्याची आई शकू नावाची मुलगी त्याच्यासाठी ठरवून ठेवते. शामलाही ती पसंत पडते. पण त्याला वडिलांचाच दुर्धर रोग होतो व त्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही.

### गावकऱ्यांचा संदेश-

देवाच्या उत्सवाचे धन एका गावातील व्यक्तीकडे ठेवायला दिलेले असते. तो ऐनवेळी त्यासाठी नकार देतो. आपोआप त्याच्या घरावर दरोडा पडतो.

आपला गाव, आपल्या गावाचा देव या गोष्टीला आत्यंतिक महत्व देणारी ही माणसे आहेत. दूरदूरचे लोक या देवाच्या भेटीसाठी येतात. 'महाराप्रमाणे खपावे अन् राजाप्रमाणे खावे हे आमचं ब्रीद !' अशा प्रवृत्तीचे हे लोक आहेत. ग्रामपुरूषाच्या कृपेनं आम्हाला काही उणे नाही ही त्यांची श्रध्दा आहे. आम्ही आज सुखासमाधानाने जे दोन घास खातो ते त्याच्याच दयेने ! तसे

नसते तर या गावाची काय गत झाली असती देव जाणे ! हे वाक्य त्यांच्या श्रध्देपोटीच येते.

## भाग्यवंत-

लोकांना निरनिराळ्या प्रसंगाच्या निमित्ताने अन्नदान करणे हे कर्तव्य समजणारी माणसे या जमान्यात आहेत. गावाचा इनामदार मात्र आपले सर्व असून अन्नदान करण्याची इच्छा नसणारा आहे. तो भुकेने व्याकुळ झालेल्या इसमाला तारण किती आणले? असा प्रश्न विचारतो. वास्तविक ब्राह्मणाचे घर पाहून भुकेलेला माणूस तिकडे जातो पण निराशेने त्याला परतावे लागते. या उलट त्याला गरीब गावकऱ्यांकडे जेवण मिळते. त्या ठिकाणीच गोपाळराव नावाच्या एका सज्जन माणसाची चर्चा निघते. गोपाळराव मात्र आहे त्यात येणाऱ्या जाणाऱ्या चार इसमांना जेवू घातल्याशिवाय सोडत नाही. गोपाळराव इहलोकीची यात्रा संपवतो तेव्हा मात्र एखादे प्रेमाचे माणूस गेल्याप्रमाणे लोक अश्रु ढाळतात व लोकांच्या अंत:करणात तो भाग्यवंत कायमचा कोरला जातो.

## ढासळलेले बुरूज-

आजोबा आपल्या नातवंडांना जुनी गोष्ट सांगताहेत अशी कथेची सुरूवात आहे. अत्यंत गरिबीच्या अवस्थेत असलेल्या लाडूबाबला त्याचा मित्र पुरूषोत्तमबाब मदत करतो. गरिबीमुळे लिलावात निघणारे लाडूबाबचे साहित्य पुरूषोत्तमबाबमुळे वाचते. श्रीमंतीच्या मदाने पुरूषोत्तमबाब धुंद झालेला नाही. या दोघांचीही देवावर भक्ती आहे. संकट किंवा सुख दोन्ही परिस्थितीत त्यांची देवावरील श्रध्दा तसूभरही कमी होत नाही. लाडूबाब ते सर्व साहित्य व मालमत्ता महारूद्राच्या पर्वणीला मंगेशीला अर्पण करतो. तेव्हा पासून ती जमीन 'लवणनिसाचं खाजन' म्हणून ओळखली जाते.

## गुरवाचे रक्त-

गावाला पाणी मिळावे या साठी वेताळाच्या भगताच्या म्हणण्यानुसार गुरव आपल्या नातवंडांना बळी देतो. गावात पाणी आल्याने आनंदी आनंद होतो अशी ही कथा आहे. स्वत:च्या नातवंडांपेक्षा वेताळाच्या साक्षात्काराला महत्व देणारा शाबा गुरव इथे आढळतो.

## मेणाची बाहुली-

या कथेत पुढारी लोकांचा उपहास करून खायला काही नसताना उपाशी दिवस काढणाऱ्या लोकांच्या दयनीय स्थितीचे वर्णन केले आहे.

लेखकाने 'ढासळलेले बुरूज' या कथासंग्रहामध्ये सर्व प्रकारची विविधता साधून सर्वत्र

वातावरणाची एकरूपता सांभाळली आहे. सरदेसाई कसलाही प्रसंग, कोणतेही दृश्य, कसलीही कल्पना सहजतेने व्यक्त करतात. त्यांची लेखनशैली साधी वळणे घेत संथपणे पुढे सरकते. प्रस्तुत कथासंग्रहातून त्यांची उच्च अभिरूची दिसून येते. कोकणातील उपमा मराठीत वापरून त्यांनी प्रादेशिकता जपली आहे. त्यांच्या लेखनात कोठेही कृत्रिमता नाही. त्यांच्या 'मोडलेला माड', 'जरीचे पातळ', 'गुरवाचे रक्त' या कथा वैशिष्ट्यपूर्ण असून जीवनातील नाट्य, मानवी स्वभावाचे विविध नमुने स्त्रीपुरूष संबंध इ. गोष्टींवर त्यांनी या कथांतून प्रकाश टाकला आहे.

सुखटणकरांनी दाखविलेल्या नव्या दिशेचा विस्तार सरदेसाईंनी केला व नव्या प्रवाहाचे सातत्य ठेवले. या शिवाय त्यांचे 'कल्पवृक्षाच्या छायेत', 'सागराच्या लाटा', 'वादळातील नौका' हे वैशिष्ट्यपूर्ण कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

## सुखटणकर व सरदेसाई यांच्या तुलनेत माट्यांच्या कथेचे वेगळेपण-

सुखटणकर व सरदेसाई यांच्या तुलनेत माट्यांचे वेगळेपण चटकन लक्षात येते. वास्तविक पाहता तिघेही समकालीन पण सुखटणकर व सरदेसाई यांच्यापेक्षा माट्यांची प्रवृत्तीच वेगळी आहे.

सुखटणकरांनी आजकालच्या गोव्याचे दर्शन आपल्या कथेतून घडविले. त्यांची माणसे वतनदार आहेत. देवदासी प्रवृत्तीला बळी पडतात तर प्रसंगी परकीयांसमोर लाचार होतात. मानवी स्वभावदर्शनाच्या उद्देशापेक्षाही ऐतिहासिक अभिमान जागृत करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. हिंदू व पूर्वापार संस्कार असलेले गोव्याचे ख्रिश्चन धर्मीय वातावरण एक व्हावे असे त्यांना वाटते.

लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या लेखनाचा प्रदेश कोकण हा आहे. त्यांच्या कथेतील माणसे खाऊन पिऊन सुखी आहेत. त्यामुळे त्यांच्यात एक प्रकारचा सुखासीनपणा आहे. देवदेवता, उत्सव, अन्नदान, परोपकार यासारख्या गोष्टींना ही माणसे महत्व देतात. या सत्प्रवृत्ती बरोबरच स्त्रीला कमी लेखण्याची प्रवृत्ती, पुरूषांचा बाहेरख्यालीपणा या दुष्ट प्रवृत्तीचे दर्शनही त्यांच्या कथेतून घडते. सरदेसाई लेखन अगदी सहज प्रवृत्तीने करतात. आई मुलगा, पतीपत्नी, मित्र, इनामदार व गावकरी यांच्या संबंधावर त्यांच्या कथेत त्यांनी प्रकाश टाकलेला पहायला मिळतो. त्यांच्या लेखनात नैसर्गिकता जाणवते.

यांच्या तुलनेत माट्यांची कथा आशय व अभिव्यक्ती दृष्ट्या पूर्णत: वेगळी आहे. वरील दोन्ही लेखकांपेक्षा आपजयंतचा उपेक्षित असा घटक माट्यांनी आपल्या लेखनात आणला. दोन वेळच्या अन्नासाठी महाग असणारी, मालकाच्या दारी काबाडकष्ट करणारी रामभरोसीसारखी, तबा महारासारखी माणसे माट्यांच्या कथेची नायक झाली. माट्यांच्या कथेतील स्त्रीदेखील

कष्टाळू आहे. कष्ट करत करतच त्यांच्या 'शेवंतीचा खराटा' मधील शेवंतीच्या आयुष्याचाही खराटा होतो. 'सतीचे शस्त्र' मधील सई बाळा गवंड्यालाही वठणीवर आणण्याची भाषा करते. अस्सल ग्रामीण व काही वेळा त्यांच्या प्रादेशिक बोलीतच माट्यांची माणसे बोलतात. आजपर्यंत वाङ्मयात गणतीत नसलेली सत्या रामोशी, तारळखोऱ्यातील पिऱ्या, 'माणुसकीचा गहिवर' मधील सुभान्या, पतिव्रता सावित्री अशी माणसे कथेची नायक बनली. आजपर्यंत वाङ्मयात कुठेच स्थान नसलेली 'उपेक्षित माणसे माट्यांनी आपल्या कथेत लेखनशैलीने जीवंत करून अजरामर केली हेच माट्यांच्या कथेचे वेगळेपण होय.

## श्री.म.माटे यांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाचे विविध पैलू

१९४० मध्ये प्रसिध्द झालेल्या लक्ष्मणराव सरदेसाईंच्या कथासंग्रहानंतर लगेचच १९४१ साली श्री.म.माटे यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह प्रसिध्द झाला व मराठी कथेला नवे धुमारे फुटले. माट्यांच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' व 'माणुसकीचा गहिवर' या कथासंग्रहांचा प्रत्येक कथेनुसार अभ्यास केल्यानंतर निष्कर्ष रूपाने काही मुद्दे मांडावयाचे आहेत.

मानव्याविषयी अपार करूणा असलेला कर्ता समाजसुधारक व साहित्यिक म्हणून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात श्री.म.माटे यांचे स्थान महत्वपूर्ण आहे. लहानपणीची अत्यंत हलाखीची परिस्थिती व शालेय जीवनात अच्युतराव कोल्हटकर व सीतारामपंत देवधर यांचे संस्कार त्यांच्या मनावर झाल्यामुळे समाजजीवनाचा वेध घेण्याची दृष्टी त्यांना प्राप्त झाली. जॉन्सनचे चरित्र, मेकॉलेचे लेख, बर्कची फ्रेंच रिव्होल्युशन वरील व्याख्याने यामुळेच जीवनाबाबतची सूत्रे माट्यांनी निश्चित केली होती. स्वदेशीचे व्रत, सरकारी नोकरी करायची नाही, वकिली करायची नाही या बरोबरच अस्पृश्यांवरील जाचक बंधने पाहून ती दूर करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. माट्यांच्या व्यक्तिमत्वाविषयी काही ठळक वैशिष्ट्ये या ठिकाणी आपणास मांडता येतील.

### १.उपेक्षितांविषयी कळवळा-

उपेक्षितांविषयीच्या आत्यंतिक तळमळीपोटीच माट्यांनी लेखन केले आहे. उपेक्षित समाजाविषयीच्या हालाखीच्या परिस्थितीची जाणिव व त्याविषयीची तीव्र वेदना त्यांच्या मनात जागी झाली. त्यांना जिथे जाईल तिथे उपेक्षित, कष्टकरीच भेटतात. ती माणसे जशी आहेत तशी माट्यांनी चित्रित केल्यानेच ती अस्सल ठरली आहेत. आपल्याला नेहमी उपेक्षितच माणसे भेटतात याची कबुली माटे स्वत: देतात. 'इतरांच्या संगतीत वर मान करून चाललो असता तो जो आंधळा एकतारीवाला फुटपाथवर बसलेला असेल त्याच्याकडे लक्ष जावयाचे ! शेकडो-हजारो श्रीमंत, देखणी, नटलेली-सजलेली माणसे भोवताली चालली असता, माझी दृष्टी चोरून

त्या अंधाकडे जाते त्याने ते रेकत म्हटलेले ''तुका म्हन्ये-''ऐकले म्हणजे मनात कालवाकालव होते व तुकारामाचे काय आहे ते ऐकावयास कुणाची तयारी नाही हे पाहून वाईट वाटते' [१] अशा या अंध, अपंग, गरीब, मजूर, पुरूष-स्त्री यांच्याविषयी माटे यांच्या मनात कणव आहे, सहानुभूती आहे.

माट्यांच्या कथासंग्रहांची शीर्षकेच मुळी 'उपेक्षितांचे अंतरंग' व त्यांच्याविषयी त्यांना वाटणारी कणव म्हणजेच 'माणुसकीचा गहिवर' अशी आहेत. त्यांच्या कथेत बालमनाचे चित्रण येते पण तो अकाली प्रौढ झालेला आई वडिलांच्या प्रेमासाठी आसूसलेला पोरका बन्सी आहे. कृष्णाकाठी हिंस्त्र पशूंना एकटे वाटेल अशा डोंगराच्या घळईत त्यांना सत्या भेटतो. पुरंदरसारख्या सृष्टी वैभवानं नटलेल्या गडावर पुरंदरच्या नामाजवळ स्वत:च्या लग्नासाठी लागणारे शंभर रूपये देखील नाहीत. पाऊस पडेपर्यंत हेलकरणीचे काम करणारी कोयना आपल्या ओढगस्तीच्या संसारातही, श्रीनिवासरावांनी दिलेले जादा चार आणे स्वीकारत नाही. श्रीनिवासरावाची याठिकाणी गोड निराशा होते.

ऐन उमेदीतच प्रपंचाचा उन्हाळा झालेली सई मोलमजूरी करून लहान मुलाकडे पाहून आपले दिवस काढते. अस्पृश्याच्या डायरीतील पिऱ्या म्हणजे जणू सवर्णांचा हरकाम्या आहे. गावाच्या हेळावर पाणी भरणे म्हणजे त्याच्या नित्याच्या गरजेला सुध्दा अटकाव केला जातो. उपाशी पोटी कामे करून घेतली जातातच पण वर चांगली का केली नाहीत म्हणून शिव्याही दिल्या जातात.

गावाकडे घर जमीन असलेला रामभरोसी कर्जबाजारी आहे. आपल्या ओढगस्तीच्या परिस्थितीतही तो धन्याच्या दारात देवडीवाल्याचे काम प्रामाणिकपणे करतो. वृत्तीने तो धार्मिक आहे. माट्यांची माणसे गरीब, उपेक्षित आहेत, भटक्या जमातीतील आहेत पण आपला माणुसकीचा गुण ती कुठेच विसरत नाहीत. गणू हलवाई मीठाई करून विकण्याचे काम करतो. माडीचे घर बांधतो पण यात्रेत म्हणा किंवा उत्सवात म्हणा जेवढा पैसा काढता येईल तेवढा काढला पाहिजे हा त्याचा हिशेब आहे. आपण आपल्यासारखेच असावे असे त्या माणसांना वाटते. अशी ही हरतऱ्हेची माणसे उपेक्षित आहेत पण मराठमोळी साधी आहेत. अशा माणसांना माट्यांनी आपल्या कथेत नायकपद दिले आहे.

## २.क्रियाशील समाजसेवक-

बोलक्या सुधारकांच्या परंपरेत हातात झाडू घेऊन काम करणारा कृतीशील सुधारक म्हणून माट्यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्वत:चा वेळ व पैसा माट्यांनी अस्पृश्योध्दारासाठी खर्च केला. कोणाकडूनही आर्थिक मदत घेतली नाही. म्हणून माट्यांना 'सनातनी सुधारक' म्हटले जाई. त्यांना 'महार माटे', 'चोरटे अस्पृश्यता निवारण' अशा प्रकारच्या टीकेलाही तोंड द्यावे लागले. समाजप्रबोधनाच्या उत्कट उर्मीपुढे त्यांनी या टीकेकडे लक्ष दिले नाही. यातील अनुभूतींचे

भांडारच माट्यांनी मराठी सारस्वतात कथांच्या रूपाने अमर करून ठेवले आहे.

कॉलेजमधील अध्यापनाचे काम सांभाळून पुण्याच्या महारवाड्यात जाऊन दररोज रात्री तिथल्या दलित बांधवांना साक्षर करण्यासाठी ते वर्ग चालवीत. त्यामुळे दलित कुटुंबांची स्थिती दारिद्रय, उपासमार, अज्ञान या साऱ्यांचा जवळून परिचय त्यांना झाला. यातून 'शेवंतीचा खराटा', 'कशाचा संसार', 'अस्पृष्टाच्या डायरीतील पाने' या कथा त्यांच्या लेखणीतून शब्दबध्द झाल्या आहेत.

'शेवंतीचा खराटा' मध्ये शब्दचित्र रेखाटून झाल्यावर ते आपली भूमिका स्वतंत्रपणे मांडतात. आज तिची काळाने उपेक्षा केली तरी तिची गटारापाशी लोळणारी नातवंडे शिक्षणाने स्वाभिमानाचे शब्द बोलू लागतील. समाजाला जाब विचारतील. ज्या उंच हवेल्यांचा सहवास शेवंतीला केर काढण्यासाठी लाभला त्यात आनंदाने तिची नातवंडे राहतील. आज काळाने ही माट्यांची भविष्यवाणी खरी ठरविली आहे.

'कशाचा संसार ?' या कथेत दिवसभर मोलमजूरी करून पोट भरणारा तबा व त्याची बायको यांना शिक्षणाविषयी आस्था आहे. माटे त्यांच्या उपयोगी पडतात. मंजूळेला तिच्या गरोदर अवस्थेत तळमजल्यावरचे काम ते बघून देतात. तिला या अवस्थेतही काम करावे लागते हे पाहून त्यांच्या मनाची कालवाकालव होते.

जेव्हा 'दलित कथा' हा शब्दही अस्तित्वात नव्हता तेव्हा माट्यांनी दलितांची वेदना शब्दबध्द केली. पिऱ्या व त्याच्या कुटुंबाला आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी ही केवढे हाल सोसावे लागतात याचे चित्रण 'एका अस्पृष्टाच्या डायरीतील पाने !' मध्ये चित्रित केले आहे. त्याचे सारे जीवन म्हणजे मुकाटपणे करायची सवर्णांची सेवा असेच आहे. हे करून देखील वर सवर्णांकडून हेटाळणी पदरात पडते ती वेगळी. पण या पिऱ्याच्या अंगी या गोष्टीचा जाब विचारण्याची हिंमत नाही पण आपला मुलगा शिद्या याने जाब विचारावा अशी त्याची अपेक्षा आहे.

हा पददलित, उपेक्षित समाज सुधारावा ही माट्यांच्या मनाची तळमळ आहे.

## ३.संत संस्कृतीशी नाळ जोडलेला कथालेखक-

महाराष्ट्राची संस्कृती ही संतांची संस्कृती. जवळपास पाचशे वर्षांपासून चक्रधर, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या थोर संतांच्या प्रबोधनाने संस्कारीत झालेला तो काळ होता. त्या काळचे साहित्य, समाजधारणा व राजकारण या बाबी संतांच्या व्यक्तित्वाने प्रभावित झाल्या होत्या. श्री.म.माट्यांना या संतांच्याबद्दल व त्यांच्या साहित्याबद्दल मनस्वी आदर होता. पंढरीचा विठ्ठल व संत ही त्यांची दैवते होती. 'नासलेले अमृत मधूर झाले', 'भिवरेच्या तीरावरील दोन देव', 'इंद्रायणीच्या वाळवंटात', 'मंगळवेढ्याचे कुसू', 'अजानवृक्षाच्या सावलीत' या

कथा त्यामुळेच माट्यांच्या लेखणीतून अत्यंत सरस उतरल्या आहेत. महाराष्ट्राच्या समाजमानाची घडण करणाऱ्या या संतांविषयी त्यांच्या मनात अतीव आपुलकीची भावना आहे.

## ४.साहित्यक्षेत्रातील स्वतंत्रवृत्ती-

श्री.म.माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' या ग्रंथात आरंभी मला थोडे सांगावयाचे आहे' या सदरात आपली लेखनाची भूमिका स्पष्ट केली आहे. माटे यांचे लिखाण त्यांच्या पूर्वीच्या लेखकांपासून अगदी वेगळे पडते. कथा लेखनाचे सर्व सांकेतिक बंध माटे यांनी झुगारून दिले. सर्वांनाच गोष्ट हे नाव शोभण्यासारखे नसले तरी 'उपेक्षितांचे अंतरंग' त्यातून व्यक्त झाले आहे. त्यांच्या गोष्टींना सत्याची म्हणजे वास्तवाची भूमिका आहे. त्यांच्या कथेतील माणसे त्यांना कुठे ना कुठे भेटलेली आहेत किंवा त्यांच्या लेखनामागे एखाद्या वास्तव घटनेचा आधार आहे. कुठल्याही वाङ्मय तंत्राची मदत न घेता अगदी विशिष्ट हेतू समोर ठेऊन किंवा अगदी सहजतेने केलेले लेखनसुध्दा, किती वेधक होऊ शकते याचे उदा. म्हणजे माट्यांचे कथा लेखन होय.

तीस वर्षांपूर्वी नारायण पेठेतून एक मुलगा भटक्या लोकांनी पळविला व दीड दोन वर्षांनंतर जळगाव जवळ त्याने आपली सुटका करून घेतली व तो आई बापाकडे आला. या वृत्तपत्रातील बातमीवरून त्यांनी 'बन्सीधरा, तू आता कुठे रे जाशील ?' ही कथा लिहिली. पस्तीस वर्षांपूर्वी सत्या रामवंशाने कृष्णा खोरे दणाणून सोडले होते. निजामशाहीत त्याला पकडले जाते. याच गडावर पुरंदरचा नामा भेटतो. तारळ खोऱ्यातील पिऱ्याला माट्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. 'हास्याचा शोध' मधील लिफ्टमन त्यांना प्रत्यक्ष भेटला आहे. 'श्रीनिवासरावांच्या हेलकरणीची हकीकत प्रत्यक्ष घडलेली आहे.

तंत्राचा विचार न करता डोळसपणे जे पाहिले ते लिहिल्याने त्यांच्या लेखनात कधी किस्से येतात, कधी शब्दचित्रे येतात, तर कधी चिंतनेही येतात. लालित्यपूर्ण शैलीने वैचारिक निबंधही ललित निबंधाइतका आकर्षक करण्याचे कसब माट्यांकडे आहे. ती त्यांच्या लेखणीची करामत!

## ५.स्त्रीजीवनाविषयी कणव-

माट्यांना स्त्रीजीवनाविषयी अपार कळवळा वाटतो. श्रीनिवासरावांचे रूप घेऊन माटे जेव्हा बाजार करण्यासाठी जातात तेव्हा ते हेलकरणीच्या डोक्यावरील ओझे कुठे तरी विश्रांतीसाठी ठेवायला सांगतात. बाईमाणूस श्रम करीत आहे याचे त्यांना मनापासून वाईट वाटते. एकसारखी रूखरूख मनाला लागून राहते.

'कशाचा संसार' या कथेत त्यांना स्त्री जीवनाविषयी वाटत असलेली कणव स्पष्टपणे जाणवते. 'गरोदर स्त्रियांनीही काम केलेच पाहिजे का ? अशी व्यवस्था होण्यासारखी नाही का,

की भावी पिढीला जन्म देण्याचे उदात्त काम ज्या शरीरात अणुअणूंनी चालू असते त्या शरीराला पूर्ण विश्रांती मिळण्यासारखी स्थिती यावी ?' आमची ती डोहाळजेवणे, तो सोपस्कार, ती आमंत्रणे त्या गरोदर स्त्रीच्या पूजा योग्य आहेत असे वाटते ; इतकेच की, त्या भोगण्यासारखी परिस्थिती सर्वांनाच प्राप्त व्हावी. ती होईल तेव्हा माणसाची जात खरोखर सुखी होईल तो पर्यंत गरिबांचे हाल चालू राहणारा ना ? माणसांना एवढा आत्मावरोपाचा आचका जरी बसत गेला तरी सुध्दा भावी क्रांतीची बीजे पोसण्यास भूमी तयार होत राहिली, असे होईल, अशा सारख्या विचारांनी मग्न होऊन मी घरी पोहचलो.'[२]

हे व्यक्तित्वाचे विविध पैलू त्यांच्या मराठी ग्रामीण कथेस पोषक ठरले. म्हणूनच त्यांची ग्रामीण कथा वेगळी ठरली. या त्यांच्या व्यक्तिमत्वातील वेगळेपणामुळे त्यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण ठरली.

## श्री.म.माटे यांच्या कथा : विविधतेतील एकता

ललित वाङ्मय हा त्यांच्या चिंतनाचा विषय नव्हता. समाजसेवा व समाजप्रबोधन हा त्यांच्या जीवनाचा ध्यास होता. वयाच्या पन्नाशीनंतर माटे कथा वाङ्मयाकडे वळले. ते ही वि.श्री. मोडकांसारख्या प्रौढ विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून. त्यांच्या सर्व कथा मार्मिक जीवनभाष्याचे नमुने आहेत. हे सारे कथावाङ्मय 'उपेक्षितांचे अंतरंग', 'माणुसकीचा गहिवर', 'अनामिका', 'भावकथा', 'भावनांचे पाझर', 'भावनांची मांडणी' अशा संग्रहातून संग्रहित झालेले आहेत. तंत्रवादाचे ओझे न बाळगता मनात दाटून आलेल्या अनुभूती विश्वाला शब्दरूप देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या अनुभूतीचा उमाळा व तळमळ रसपदवीला जाऊन पोहचते.

### अ)संतसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या कथा-

'इंद्रायणीच्या वाळवंटात' या ललित लेखात माट्यांनी तुकारामाच्या आध्यात्मिक प्रवासाचा मागोवा घेतला आहे. माट्यांनी वापरलेली समर्पक शब्दयोजना, तुकारामाचे अभंग यावरून त्यांचा संत साहित्याचा सखोल व्यासंग जाणवतो. तुकारामाचे चरित्र हे एका साध्या माणसाचे चरित्र असे आपल्याला वाटते. पण परमेश्वर प्राप्तीसाठी 'येणे सुखे माझा फुटो पाहे प्राण' अशा अवस्थेपासून परमेश्वर भेटल्यानंतरची तृप्तीची अवस्था इथपर्यंत तुकारामाने केलेली साधना पाहिली तर तुकाराम व आपली बरोबरी होत नाही हे माट्यांना जाणवते.

'नासलेले अमृत मधुर झाले' ही एक काल्पनिक कथा. देवलोकीच्या इंद्र, गंधर्व, किन्नर यांना पृथ्वीतलावरील मानवाप्रमाणे कल्पून देवलोकीचे अमृत चोखामेळ्याच्या केवळ नजरेने शुध्द झाले अशी कल्पना केली आहे. चोखामेळा हा खरा दलित पण त्याच्या दृष्टीने अमृत शुध्द होते हे सांगून एक अस्पृश्य सुध्दा भक्तीसाधनेच्या बळावर श्रेष्ठ ठरतो हे माट्यांना इथे सांगावयाचे

आहे. ज्या प्रमाणात इंद्रलोकी अमृत प्राशन करणारे देवलोक श्रेष्ठ आहे, अमरपुरी श्रेष्ट आहे त्याचप्रमाणे चोख्याच्या घरी दरदर पाण्यात रांधलेल्या कण्या खाण्यासाठी हजर राहणारी पंगतही श्रेष्ठ आहे. या पंगतीला जगताच्या आरंभस्थानचे मेहूणसुध्दा हजर राहते. विठ्ठलाच्या भक्तीत रममाण झालेल्या चोख्याला नामामृतापेक्षा आणखी काहीच गोड लागत नाही. त्याला अमृताची थोरवी सुध्दा फिकी वाटते.

'भिवरेच्या तीरावरील दोन देव' हा दोन संतशिरोमणी, ज्ञानदेव व नामदेव यांच्यातील संवाद आहे. हे दिव्य प्रतिभाशाली मुमुक्षु भिवरेच्या तीरावर एकादशीच्या पुण्यदिवशी भेटतात. नामा रकट्याची लंगोटी व कमरेला सुंभाचा कटीदोरक बांधून किर्तन करतो. दोघेही आपणाला पांडुरंग कसा भेटला ते सांगतात. ज्ञानदेवांना तो ज्ञानमार्गाने भेटतो तर नामदेवांना तो भक्तिमार्गाने भेटतो. नामदेवांना ज्ञानमार्गाचा महिमा कळावा असे वाटते तर ज्ञानदेवांना भक्ती प्रांगणातील सुख भोगावेसे वाटते. पण दोहोंचा समेट नामाच्या या वाक्याने माटे करतात. ''माझ्या टाळांना तुझ्या ज्ञानेश्वरीचा पाया असू दे ; आणि तुझ्या ज्ञानाला माझ्या टाळांनी प्रेमगोडी येऊ दे-'' [३] भक्तीमार्ग व ज्ञानमार्ग यांचे अभेद्यत्व माटे इथे वर्णन करतात.

'मंगळवेढ्याचे कुसू' या कथेत एक महार जातीतील चोखा नामदेवाच्या किर्तनाने प्रभावित होऊन संत चोखामेळा या पदापर्यंत पोहचतो. वास्तविक चोख्याच्या मनात आपल्याला हे ज्ञान घेता येईल का? आपला उध्दार होईल का? अशी शंका आहे. पण नामा त्याला अभय देतो. चोख्याला शिष्य करून घेतो. 'एक तरणा पोरसवदा महार गळ्यात माळ घालून, गोपीचंदनाचे टिळे लावून, गळ्यात एकतारी बांधून संतमंडळींच्या गोटात उभा राहून भिवरेच्या तीरावर महाद्वारात भजन करू लागला. महाराष्ट्रात एक प्रचंड क्रांती झाली.' [४] केवळ चोखा नव्हे तर त्याची बायको सोयराही भक्तीमार्गात श्रेष्ठ ठरली ती अभंगरचना करू लागली. त्याचा मुलगा कर्मा भक्त झाला. भक्तीच्या क्षेत्रात 'यारे सारे लहान थोर याती भलते नारी नर' हेच जणू माट्यांना या ठिकाणी दाखवायचे आहे.

'अजानवृक्षाच्या सावलीत' ह्या निबंधात ज्ञानदेवांच्या समाधी अवस्थेच्या वेळी निवृत्ती, मुक्ता, सोपन यांच्या मनाच्या अवस्थेचे वर्णन करून ज्ञानदेवांचे श्रेष्ठत्व वर्णिले आहे. त्यावेळी आपण असतो तर त्यांना कोरान्न आणून दिले असते. नम्रपणे आपण ज्ञानेश्वरी उतरून घ्यावयास बसलो असतो असे माट्यांना वाटते. ज्यांनी बुध्दीने व कर्तृत्वाने मानवाला वैभव प्राप्त करून दिले त्यांचे स्मरण करण्याची ऐतिहासिक रसिकता माटे जपतात. एवढ्या लहान वयात त्यांनी एवढी ज्ञानाची क्षेत्रे कशी उल्लंघिली याचे माट्यांना आश्चर्य वाटते. तसेच आपला मार्ग हा शूद्र माणसांचा, मुंगीचा असल्याची प्रांजळ कबुली ते या निबंधात देतात.

माट्यांनी इथे मराठी संतांच्या विषयी लालित्यसंपन्न शैलीत चिंतन प्रकट केले आहे. खरे

तर कथा या वर्गीकरणात वरील कोणतीही कथा बसत नसून हे वैचारिक निबंध आहेत. हे सर्व व्यक्त करताना माट्यांच्या व्यासंगाचा प्रत्यय येतो. माटे अतिशय नम्र भूमिकेने या संतांच्या विषयी कृतज्ञता भाव व्यक्त करतात. त्यांची या संतांवरील श्रध्दा डोळस आहे. सामान्य माणसालाही या चिंतनातून एक उपदेश मिळून जातो.

## आ)दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा-

'दलित वाङ्मय' हा शब्दही निर्माण झाला नव्हता त्या कालखंडात माट्यांनी दलितांची वेदना शब्दबध्द केली.

'कशाचा संसार?' ही दलित मजुराचे जीवन चित्रण करणारी कथा. दोन वेळची पोटाची खळगी भरण्यासाठीच तबा व मंजुळा या जोडप्याला पहाटे चार वाजल्यापासून संध्याकाळ पर्यंत राबावे लागते. ते प्रपंच करतात पण कशाचा प्रपंच असे त्यांना वाटते. सकाळपासून संध्याकाळ पर्यंत काम आणि काम! कारभारणीने काम करू नये तर एकट्याच्या कमाईत भागणार कसे? पोटाच्या मागे वणवण फिरावे लागते.

लेखक म्हणतो,''प्रेमी माणूस आपल्याला नाही म्हणून पुष्कळ लोक खिन्न असतात, पण प्रेमी माणूस असून प्रेम करावयास वेळ नाही. अशी सहस्त्रावधी लोकांची स्थिती झालेली असते.'' आणि पोटाच्या पाठीमागे लागल्यामुळे बायकोच्या प्रेमळ सहवासालाही वंचित होणारा या कथेचा नायक म्हणतो,''कशाचा संसार? कधी एकाजागी खुशालीनं बसायला सापडतंय का गोडीनं बोलायला सापडतंय?....सांचीपारानं सडकेनं येताना तुमची बायामानंस अन बापई फिरायला निघालेली दिसत्यात ; ती खुषीनं गोष्टी करत्यात, हसत्यात, हवा खात्यात, तवा माज्या मनात येतं की, आमचं जिनं बगा काय मातीच्या मोलाचं! देवा चांडाळा, असं का केलंस !''[५] जानपद जीवनातील प्रणय हा असा असतो.

'एका अस्पृष्टाच्या डायरीतील पाने' ही तर पिऱ्या नावाच्या एका महाराची हाल विपत्तीने भरलेली एक दिवसाची दैनंदिनी आहे. दिवस उगवल्यापासून ते काळवेळ याचा विचार न करताच त्याला राबवून घेतले जाते. त्याला त्याचे रोजचे विधी उरकायलादेखील उसंत दिली जात नाही. साहेब पुढच्या गावी जाणार आहे त्याची वर्दी देणे, साहेबाच्या हापीससाठी लाकडं फोडणे ही कामे त्याला करावी लागतातच पण त्याचा मोबदलाही कुणी विचारीत नाही. उलट लाकडे बारीक का फोडली नाहीत म्हणून शिव्या खाव्या लागतात.

गावच्या हेळावर पाणी मिळावं म्हणून या समाजातील लोकांना तासन्तास उभे रहावे लागते. महमदभाईच्या बहिणीने त्या हेळात चुळा भरल्या तर चालतात. पण पिऱ्याच्या मुलीला स्वत:हून पाणी घेण्याची सत्ता नाही. असा विरोधाभास माटे कथेत रंगवतात. किर्तनकाराच्या मंडपात

मुस्लीम फौजदाराला प्रवेश आहे. पण पिऱ्याला मात्र बाजूला हो, याला लागशील, त्यांना लागशील असे हेटाळणीचे बोलणे ऐकून घ्यावे लागते. आणि बुवा मात्र 'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।। तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा।'हा अभंग निरूपण करीत असतो. विरोधाभासातूनच माट्यांनी ही कथा ठळक केली आहे. पण या गोष्टीचा प्रतिकार मात्र ही माणसे कुठेच करीत नाहीत.

'नाथनाक व देवकाई यांची काळझोप' ही महार समाजाचे अज्ञान व कमालीचे दारिद्रय यांचे चित्रण करणारी कथा. पुरंदरसारख्या अभेद्य डोंगरावर रखवालीचे काम करणारी ही जमात अतिशय दरिद्री आहे. बहिरनाकच्या अज्ञानीपणाचा व भोळेभाबडेपणाचा फायदा घेऊन दादा कलम त्याला आपली सून व मुलगा पुरंदरच्या किल्ल्यात बळी देण्यासाठी भाग पाडतो. आत्यंतिक दारिद्र्यापोटी तो तयारही होतो पण आयत्यावेळी त्याचे पित्याचे काळीज तडफडून उठते. वात्सल्याने उरी फुटून बहिरनाक मरून जातो. बळी दिल्यानंतर त्याचे काय झाले इतिहास जाणे असा करूणाजनक शेवट माटे करतात.

'शेवंतीचा खराटा' हे शब्दचित्र आहे. 'पदुर आला तवा धरनं' शेवंता हे काम करते. आज ती साठीची आहे. तिच्या सर्वांगावर सुरकुत्या पडलेल्या आहेत. सुखाची व तिची कधी गाठच पडलेली नाही. नवरा मरून गेला. मुलगा चार पोरे पदरात ठेऊन निघून गेला. थोरली सून बाहेरख्याली निघाली. ल्येकी समद्या गेल्या. हाच तिच्या प्रपंचाचा हिशेब आहे. खराटा मात्र चाळीस पंचेचाळीस वर्षे तिची साथ करीत आला आहे. असे हाल अपेष्टांनी भरलेले जीवन ती जगते.

श्री.म.माटे यांनी लिहिलेल्या दलित कथांतून आजच्या दलित कथेची बीजे दिसून येतात. तत्कालीन वाङ्मयीन संकेत झुगारून महारी बोलीचाच वापर करून दमदार वास्तवाशी भिडणाऱ्या शैलीचा त्यांनी वापर केला. त्यांच्या कथेतून पददलितांच्या वेदनाच नव्हे तर दलित आत्मोध्दाराच्या चळवळीचे भाकीत ही आहे. त्यांच्या या कथांतून त्यांना वाटणारी पददलितांविषयीची सहानुभूती, कळवळा, जिव्हाळा, समाजोन्नतीची आस असल्याने या कथा प्रत्ययकारी झाल्या आहेत.

## इ)भटक्या जमातींचे चित्रण करणाऱ्या कथा-

माट्यांनी जशा उपेक्षित माणसांच्या कथा लिहिल्या तशाच भटक्या जमातीचे चित्रण करणाऱ्या कथाही लिहिल्या. ही माणसे भटक्या जमातीची असूनही माणुसकी सोडत नाहीत.

'बन्सीधर ! तू आता कुठे रे जाशील?' या कथेत लेंगरे गावाजवळ कातकऱ्यांचा तळ आहे. सरासरी दहा बारा झोपड्यांची ही वस्ती. दारिद्र्याने या तळावर जणू वस्ती केली आहे. बायांच्या केसाच्या व पुरूषांच्या दाढीच्या जटा झालेल्या आहेत. एखादा कोरा जरीचा फेटा, एखादा

चॉकोलेट रंगाचा मफलर, कातडी काळी ट्रंक याखेरीज झोपडीत काहीच नाही. मध्येच एखादा साधारण पोशाख केलेला माणूस येथे टेहळणीसाठी येतो. या वर्णनावरून समाजातील एका घटकाची उपेक्षा नजरेत खुपते. पण याच वस्तीवर राहणारा चिम्या व तुळशी हे जोडपे बन्सी या आई बापाविना असलेल्या पोरक्या पोराला आई बापाचे प्रेम देते. चिम्या आडदांड व महातामसी आहे. म्हादेवाच्या डोंगरात वांद्र मारून खाऊन ही माणसं दिवस काढतात. पण बन्सीचा सांभाळ देवाचा पोर म्हणून करतात. आत्यंतिक दारिद्र्यातही ही माणसे प्रेम, वात्सल्य विसरत नाहीत. हा कातकरी समाज या अनुभव विश्वात जागा होतो.

'कृष्णाकाठचा रामवंशी' या कथा शीर्षकावरूनच जमातीचा बोध होतो. हिंस्त्र पशूंनासुध्दा एकटे वाटेल अशा डोंगराच्या घळईत सत्या बसला आहे. त्याच्या जोड्याच्या एकेका तडाख्याने त्याने कैकास पाणी मागू दिले नव्हते. वर्णनावरून क्रुर वाटणारा हा सत्या नातेसंबंध जपणारा, दिलाचा दिलदार, गरिबांचा वाली आहे. इंदापूरकरांच्या घरी सावित्रीकडून मिळणारा पाहुणचार तिनं जेऊ घातलेला दूधभात या आदरातिथ्याने तो भारावून जातो. तिला आपली बहिण मानतो. सर्व दागदागिने परत करतो. समाज परंपरेचा एक बळकट धागा या प्रसंगातून आपल्या नजरेत भरतो. ''सत्या आला ! सत्या आला !'' अशी धास्ती सर्वांनाच आहे. पण तो जेव्हा शाळेत येतो तो मुलांना पेढे बर्फी वाटण्याच्या उद्देशाने. याच कथेत बाजारचे चित्र येते. दुष्काळात सापडलेले हे शेतकरी जवळ पैसा नाही व निसर्गाची अवकृपा यामुळे रंजीस आले आहेत. पण गरीबांचा कैवारी सत्या ही लूट या शेतकऱ्यांना मदत म्हणून करतो. रक्मीच्या कारस्थानामुळे सत्या केव्हा पकडला जातो तेव्हा तो आम्ही प्रभू रामचंद्राचे नोकर, आम्ही चोर न्हाई अशी साक्ष देतो. खरोखरीच ही माणसे चोर नाहीत तर भाविक, गरिबांच्या हाकेला धावून जाणारी आहेत.

सृष्टीने सर्व उग्र वैभव बहाल केलेला पिऱ्या तारळीच्या खोऱ्यात डोंगरकपारीच्या आश्रयाने रहात होता. सडकेच्या बाजूचे केकताड कापावे ते भिजत घालून त्याचा वाक करावा व त्याची चऱ्हाटे करून बाजारात विकायला बसावे हे पिऱ्याला नकोसे वाटे. हे काम त्याला क्षुद्र व नेभळे वाटे. अंगात खिलारी खोंडांचे बळ होते त्यामुळे पिऱ्या पुंड बनला होता. चोरी दरोडे घालणारा हा पिऱ्या वृत्तीने भाविक आहे. त्याची पत्नी त्याला पालीच्या जत्रेला न जाण्याचा सल्ला देते. पण पिऱ्या तिला विरोध करतो. ''तू अशी बोलतियास? चंद्राबाई तू अशी कशी बोलतियास? समद्या पिर्तिमित आपल्याला कुनी हाये काई? येक आपलं जातवालं; अन दुसरा पालीचा खंडुबा, वर्सातनं एकदा दरसान घडतयां, त्यवडं बी सोडलं तर चोरी दरूड्या पलीकडं काय रायलं?''[६] त्याची पालीच्या खंडोबावर श्रध्दा आहे. या जत्रेला अवघ्या हिंदू जनांची होणारी खेचाखेच समाजाच्या रोमारोमात भिनलेल्या श्रध्देचे दर्शन घडविते.

शिद्या, बापू, चंडिराम व सुभान्या ही वास्तविक चोरी करणारी माणसे पण 'माणुसकीचा

गहिवर' या कथेत त्यातही एक पात्र माट्यांना माणुसकीने, वात्सल्याने ओथंबलेले दिसते. मुलीचे पाय तोडून मिळालेले दागिने या सुभान्याला नको असतात. त्यापेक्षा तो आपला चोरीतला वाटा सोडून द्यायला तयार होतो. सुभान्याच्या रूपानं माणुसकीच जणू मूर्त रूप घेऊन उभी राहते.

श्री.म.माट्यांनी भटक्यांचे, उपेक्षितांचे जीवन जवळून पाहिले, त्यांची सुखदु:खे समजावून घेतली. माट्यांच्या समाजशास्त्रीय अभ्यासाने त्यांना प्रगल्भ अशी सामाजिक जाण दिली. समाजाच्या खालच्या थराचे, दारिद्र्यात अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाचे जीवन त्यांची राहणी यांचे सखोल निरीक्षण केल्याने या कथा प्रत्ययकारी झाल्या आहेत.

## ई)कामगार जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा-

माटे मास्तर मुंबईला जातात तेथे त्यांना आराम असतो. मनसोक्त फिरावं, नारीयल आस्वादावा असा दिनक्रम असतो. पण तेथेही त्यांना भेटतात हात पाय अधू असलेले तरूण लोक, पोटावर थापट्या मारणारी पंगू माणसे. ते ज्या डॉक्टरकडे जातात तिथला लिफ्टमन जगाशी आपले नाते नाहीच असा वावरत असतो. माटे मास्तर एकदा धडपडून पडतात त्यांची टोपी उडते पण तरीही तो हसत नाही. डॉक्टरचे काम ज्या दिवशी संपते त्या दिवशी ते लिफ्टमनला चार आणे देतात. त्या दिवशी तो गरीब मनुष्य हसतो. गरिबीमुळे त्या लिफ्टमनला कशाचेच काही नाही. हे चित्रण 'हास्याचा शोध' या निबंधात येते.

माटे मास्तर 'श्रीनिवासरावांची गोड निराशा' या कथेत श्रीनिवासरावांचे रूप घेऊन मंडईला जातात तिथे ते एक पाटीवाली ठरवतात. तिला ओझे झाले असेल का, ती थकली असेल का अशी चिंता त्यांना वाटत राहते. श्रीनिवासराव तिची आस्थेने चौकशी करतात. ती धंदेवाईक पाटीवाली नसते. भोरकडे तिची शेतीवाडी असते. पाऊस पडल्यावर ती आपल्या गावाकडे जाणार होती. तांदूळ किंवा कण्या उकडून खाणारी ती पाटीवाली पण धर्माचा एक आणा तिला नको असतो. दामाचे तेवढेच दोन आणे तिला हवे असतात. मुलांना खाऊला दिलय असे जेव्हा तिला सांगितले जाते तेव्हाच ती त्याचा स्वीकार करते. पैसा घेऊन ती तरातरा निघून जाते. तिचे हसून काही श्रीनिवासरावांना पहायला मिळालं नाही.

'पुरंदरचा नामा' ही हेलकऱ्यांच्या कष्टप्रद जीवनाचे चित्रण करणारी कथा. पुरंदरसारख्या सृष्टीवैभवानं नटलेल्या गडावर श्रीनिवासराव जातात तेथे त्यांना जे निसर्ग सौंदर्य दिसते ते पार्श्वभूमी म्हणून. त्या पार्श्वभूमीवर त्यांना दिसतो तो मोलमजूरी करून पोट भरणारा नामा. त्याच्या बरोबर तशाच दारिद्र्यात हलाखीचे दिवस काढणारी कोंडी, चिमी, गेन्या आणि येशा. श्रीनिवासरावांनी दिलेल्या फराळामुळे व मजुरीमुळे ती संतुष्ट होतात. ही माणसे कुठेही चिडत नाहीत किंवा बंड करीत नाहीत.

रामभरोसी एका पारशी गृहस्थाच्या घरी नोकर आहे. शरीरानं धट्टाकट्टा असणारा हा गृहस्थ मनाने अस्वस्थ आहे. महिन्याकाठी मिळणाऱ्या तीस रूपयांपैकी पाच रूपयांत स्वत:ची गुजराण करणारा हा गृहस्थ पण कर्जबाजारी होता. पत्नीबरोबर राहण्याची त्याची साधी हौससुध्दा त्याला वेळेवर पूर्ण करता येत नाही. पुढे कर्जबाजारीपणामुळे त्याच्या जमिनी गहाण पडतात पण त्याचा वृत्तीने दिलदार धनी त्याचे सर्व ऋण फेडायला त्याला मदत करतो. आपण धन्याची करतो तेवढी सेवा रामाची केली असती तर वार्धक्यात रामाने आपल्याला कस्पटासमान लेखले नसते असे धन्याबद्दल विचार करणाऱ्या रामभरोसीच्या मनात धन्याने केलेली मदत पाहून माणुसकी जागृत होते व तो मरेपर्यंतचा रखवालदार म्हणून धन्याच्या दारात हजर होतो. माट्यांची माणसे माणुसकीला जागतात ती अशी !

गणू हलवाई हा तसा पहायला गेल्यास कामगार नाही. गणू हलवायाचे मिठाईचे दुकान आहे. गणू हलवाई व त्याची बायको सारजाबाई अखंड कष्ट करून आपल्या दहा पोरांचा प्रपंच रेटतात. कधी भांडण नाही की तंटा नाही आपण बरा की आपला प्रपंच बरा असे त्याचे वागणे आहे. याच धंद्यावर गणू मोठाले घर बांधतो. माडीच्या चांदईच्या खिडकीत उन्हाला पाट टेकून बसावे अशी त्याची परिस्थिती सुधारते पण बाजार असो, जत्रा असो जेवढा पैसा काढता येईल तेवढा काढला पाहिजे. हा गणूचा हिशेब आहे. अखंड अहोरात्र कष्ट करणारा हा गणू शेवटी मात्र एकाकी पडतो.

या सर्व कामगार वर्गाच्या माणसांच्या मनाचा माट्यांनी बारकाईने अभ्यास केला आहे. माट्यांच्या मनातील माणुसकी केवळ यांच्या दर्शनानेच जागी होत नाही तर ती झऱ्यासाखी झुळूझुळू वहात असते. या माणसांचे असे दु:ख काय? की यांना हसावेसे सुध्दा वाटू नये. या माणुसकीमुळे त्यांच्या अनुभव विश्वाला एक स्निग्धता प्राप्त होते.

## उ)स्त्री जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा-

'शंभू शिखरीचा राजा' ही पार्वती नावाच्या पतिव्रता स्त्रीच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारी कथा आहे. प्रपंचाची खरी काळजी तिलाच आहे. सडासारवण करून ती घरदार आरशासारखे ठेवी. ही स्त्री पतिव्रता आहे. दर अमावस्येला शंकर जेव्हा शिखरीच्या वारीला जाई तो परत येईपर्यंत ती जागरण करते. घरी आल्यावर त्याच्या पायांना तेल लावते. आपल्या नवऱ्यावर खोटा खुनाचा आळ आला आहे व त्याला पकडून नेले जाते तेव्हा ही स्त्री शंभूच्या दारात तरी मी न्याय मिळवून घेईनच असा चंग बांधते. गावाबाहेरच्या भल्या मोठ्या पिंपळाच्या पारावर पिंपळाला प्रदक्षिणा घालण्याचे असिधारा व्रत स्वीकारते. नवऱ्याला तुरूंगात सक्त मजुरीचे कष्ट लावतात हे कळताच ती पीठ खायचे वर्ज्य करते. कैद्याच्या पाठीवर वेताचे फोक उठवितात हे कळताच ती मऊ अंथरूण वर्ज्य करते. गावातील स्त्रियांना ती म्हणजे एक दैवत बनते.

नवऱ्याप्रमाणेच शिखरीच्या शंभूवर तिची श्रध्दा आहे. शंकर देशपांडे जेव्हा निर्दोष सुटतो तेव्हा ती त्याची भेट शंभूराजाच्या पायाजवळच घेण्याचे निश्चित करते. शंकर पार्वतीची भेट उत्सवी वातावरणात होते.

'सतीचे शस्त्र' मधील स्त्री ही बंडखोर व्यक्तिमत्वाची आहे. तिचा नवरा रामा भिंगारे कामावरून येतो व एकाएकी मान टाकतो. सई विधवा होते. तिच्या प्रपंचाचा उन्हाळा होतो. पण गरीबांना मान खाली घालून जिणेसुध्दा सोपे नसते. धष्टपुष्ट व चांदीचे कडे हातात असणारा बाळा गवंडी तिची छेड काढतो तेंव्हा ती तोंड सोडते. बाजू तिच्यावर उलटण्याचा प्रसंग येतो. पण दादासाहेब मध्ये पडतात व प्रसंग निभावतो. पण नवऱ्याच्या जोड्यानं या बाळा गवंड्याची पुजा करणारी ही स्त्री अन्यायाचा प्रतिकार करणारी रंगविली आहे.

'शेवंतीचा खराटा' हे एका झाडूवालीचे शब्दचित्र आहे. अवघा जन्म या बाईने खराटा फिरविण्यात घालविला. 'नवरा कवाच मरून गेला, थोरला ल्योक चार प्वारं ठिवून निगून गेला, सूनेनं पोरं माज्या पदरात टाकली अन ती बी एका बाबा बरूबर निगुन गेली, धाकटा ल्योक उलीसा बरा हाइ, ल्येकी समद्या उलातल्या. सून साळा झाडती, प्वारं सडकनी हिंडत्यात' [७] हा या स्त्रीच्या प्रपंचाचा हिशेब आहे. ही स्त्री मूठभर मातीची वाट पहात आहे.

'सावित्री मुक्यानेच मेली' ही एका पतिव्रतेची कथा आहे. त्या कालखंडातील स्त्री जीवनाचे प्रातिनिधीक रूप म्हणजे सावित्री. पण ही कथा लेखकाने शोक पर्यवसायी केली आहे. पद्माकराच्या मागे घरची सर्व जबाबदारी सांभाळून लहान दीराची आईप्रमाणे काळजी घेणारी ही व्यक्तिरेखा या कथेत माट्यानी व्यक्त केली आहे. ही स्त्री धार्मिक आहे. सकाळी गंगेवर स्नान, देवाची उपकरणी घासणे, पुजाअर्चा हे सारे तिचे नियम आहेत. चित्तात पद्माकराचा जप, तोंडात रामचरित्राची स्तोत्रे आणि व्यवहारात कडकडीत सरळपणा हे सावित्रीचे कवच होते. वासुदेव बळवंतांच्या चळवळीत सामील झाल्याने पद्माकराला जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा होते. सर्व कुटुंबीय त्याला भेटायला पुण्याला जातात. तेव्हा ती ऋतुमती होते व पद्माकराची सुटका जेव्हा होते तेव्हा ती प्लेगामुळे मृत्युमुखी पडलेली असते. असा संपूर्ण कथाभर या स्त्रिचा भावनिक कोंडमारा होतो. पण ती ते सर्व पद्माकराची पत्रे मधून मधून येत असल्याने सुसह्य करते. पण पद्माकराची भेट व्हावी असे तिला मनापासून वाटते. पद्माकराचे पत्र आलेल्या दिवशी तिच्या चित्तवृत्ती उल्हसित होतात. कथा शोकपर्यवसायी केल्याने स्त्री स्वभावाचा भावनिक कोंडमारा या कथेत झाला आहे.

## ऊ)इतर कथा-

'माझे दहन तुम्हीच करा' या कथेत दोन भिन्न धर्मियांचा मिलाफ माट्यांना दाखवायचा

आहे. पारशी व ब्राह्मण या दोन्ही संस्कृती भिन्न असल्या तरी तायडी व धनजी यांचा मनोमिलाफ दाखविण्यामध्ये माटे कमालीचे यशस्वी झाले आहेत. ती दोघेही एकमेकांच्या धार्मिक आचरणाच्या आड तर येत नाहीतच पण दोघेही प्रत्येकाच्या धर्माचा आदर करतात. याच कथेत माट्यांनी विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केलेले पहायला मिळते. कारण तायडी बालविधवा आहे. नर्मदाबाई व नाना यांचे तायडीसंबंधी बोलणे चाललेलें असताना सुध्दा नर्मदाबाई सनातनी विचाराच्या तर नाना पुरोगामी विचाराचे चित्रित केले आहेत. श्री.म.माटे यांचे समाजसुधारणे विषयी विचार या कथेतून चित्रित होतात.

'या पोराला आता तूच सांभाळ' ही अद्‌भूतरम्यतेचा वापर करून लेखन केलेली कथा आहे.

अशी ही माट्यांच्या कथामध्ये विविधता असली तरी त्यात एक महत्वाचा समान धागा आहे. तो म्हणजे या कथा उपेक्षित व्यक्तीविषयी आहेत, समाजातील विविध सामान्य स्तरांतील हे स्त्रीपुरुष आहेत. त्यांची नशीबानेच उपेक्षा केलेली आहे. अशा या उपेक्षित व दुर्लक्षित समाजघटकाविषयी माटे यांच्या मनात कणव आहे. म्हणूनच त्या सर्वांचे ते पाठिराखे आहेत, आधार आहेत. माट्यांच्या मनात माणुसकीविषयी गहिवर असल्याने समाजातील उपेक्षित स्त्रीपुरूषांचे अंतरंग ते वेधक व प्रभावी रीतीने दाखवू शकतात.

## श्री.म.माटे यांचे वेगळेपण

### १)लक्षणीय व्यक्तिचित्रे-

माट्यांचे 'उपेक्षितांचे अंतरंग' व 'माणुसकीचा गहिवर' दोन कथासंग्रह वाचत असताना त्यानी अशी काही लक्षणीय व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत की ती वाचकांच्या कायमची लक्षात राहतात.

'बन्सीधर, तू आता कुठे रे जाशील?' कथेतील बन्सी, वयाने दहा बारा वर्षांचा असणारा हा कोवळा पोर कातकऱ्यांच्या तळावर राहतो. तिथे त्याला आई वडिलांचे प्रेम मिळते. पण प्रत्यक्ष आपल्या आइ- वडिलांच्या प्रेमासाठी तो आसुसलेला आहे. आई वडिलांच्या शोधात तो बाहेर पडतो. सांगोले गावी येतो. तेथे त्याला वडिल भेटतात, पण आई भेटत नाही. तेथे त्याला कळते की आपली आई कलेढोण गावी असते. तेथेही तो जातो. पण ती मोहनलाल सोबत रहात असते. हे पाहून त्याच्या चित्ताचा कांदा उन्मळून बाहेर येतो. तो पुन्हा लेंगऱ्याच्या माळावर येतो. तेथेही तुळशीआई व चिम्याला धरून नेलेले असते. बन्सी एकाकी राहतो. त्याच्या दैवदुर्विलासाचे वर्तुळ पूर्ण होते. सर्व सामान्य वाचकाला ही कथा विचार करायला लावते.

'सत्या' भटक्या रामवंशी जमातीतला. रक्ताच्या जिभल्या चाटणारी फरशी जवळ बाळगणारा, अंगाने सशक्त असणाऱ्या सत्याचे दरोडेखोर म्हणून वर्णन केले आहे. पण या माणसातही माणुसकी असते याचे वेगळेच दर्शन ही कथा वाचल्यावर घडते. इंदापूरकरांच्या घरी दरोडा घालण्याच्या पवित्र्याने गेलेला सत्या, सावित्रीचे आदरातिथ्य पाहून, तिच्या हातचे दूधभाताचे जेवण करून तिला बहिण मानतो. सत्याची मुद्रा उग्र खरी पण तो वृत्तीने शांत व प्रेमळ आहे. 'सत्या आला, सत्या आला' अशी शाळेतून उठणारी आवई त्याच्या दहशतीची आहे. पण तो मुलांना पेढे बर्फी वाटण्याच्या उद्देशाने आला आहे. तो बाजारची लूट करतो. ती ही गरीबांच्यासाठी. घंटाभर लुटीची जी धूम उठते त्यामुळे सत्या आनंदाने बेहोष होतो.

शेवंती हे असेच एक व्यक्तिचित्र. झाडूवालीचे चरित्र ते काय असणार? असा प्रश्न पडतो. 'पण पदुर आला तवा धरनं' ही हे काम करते. तिचा खराटा गेली चाळीस वर्षे तिची सोबत करीत आला आहे. उतारवयात तिला तशी कोणाचीच साथ नाही. ही मूठभर मातीची वाट पहात आहे. पण शिकल्या सवरल्या माटे मास्तरांबद्दल तिला आदर आहे. दोन्ही हात जोडून ती त्यांना नमस्कार करते. माटे मास्तरांबद्दल तिला आदर आहे. दोन्ही हात जोडून ती त्यांना नमस्कार करते. माटे मास्तर आपल्या वस्तीत येतात, मुलांना शिकवतात, प्रसंग पडल्यास लोकांना औषधपाणी करतात एवढे ती जाणून आहे. माणुसकीच्या जागृतीला इतकी अल्प गोष्ट पुरते. 'शेवंतीचा खराटा' हे माटे मास्तरांचे अमर झालेले शब्दचित्र आहे.

'सावित्री' हे एक वेगळ्याच प्रकारचे व्यक्तिचित्र आहे. शोकपर्यवसायी असणाऱ्या या कथेत सावित्री लक्षात राहते ती एक सत्यनिष्ठ पतिव्रता म्हणून ! वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडात सामील होतो म्हणून तिचा पती पद्माकर जन्मठेप काळ्या पाण्याच्या शिक्षेवर जातो. त्याची व तिची एकदाही भेट होत नाही. तिचा भावनिक कोंडमारा होतो. पण पतिच्या तुरुंगातून येणाऱ्या एका पत्राने ती हे सर्व सुसह्य करून घेते. नव्हे तेवढ्या पत्रानेही तिच्या चित्तवृत्ती उल्हसित होतात. पण दैवाने वेगळेच ठरविलेले असते. अखेर पर्यंत दोघांची भेट होत नाही. तो येतो तेव्हा ती प्लेगाच्या साथीची बळी ठरलेली असते. अशी अनेक लक्षणीय व्यक्तिचित्रे माट्यांच्या लेखणीतून साकारली आहेत.

## २)ग्रामीणता-

माटे मास्तरांच्या कथांत त्यांनी सामाजिकतेचे नेटके भान राखले आहे. सर्व उपेक्षित वर्गाविषयी त्यांना आत्मीयता वाटते. या ममत्वाचे मूळ त्यांच्या पूर्वजीवनात होते. शिंगणापूर, विटे, रेणावी या लहान गावात राहिल्याने त्यांनी कातकऱ्यांची पाले, दोरखंडे वळणारे मांग, सनई वाजवणिारे कैकाडी, मडकी थापटणारे कुंभार जवळून पाहिले होते. ती प्रजा त्यांना आपली वाटली व त्यांच्यासाठी काही करणे हेच त्यांचे जीवनविषयक तत्वज्ञान बनले. सभोवतालच्या

समाजाचे प्रतिबिंब त्यांच्या मनात पडले त्याचाच आविष्कार भाषाप्रभू माट्यांनी आपल्या कथालेखनात केला.

सातारा जिल्ह्यातील प्रदेश माट्यांच्या कथासृष्टीतून चित्रीत होतो. रंग, रूप, रस गंधासह माट्यांनी त्या प्रदेशातील माणसे व कथा आशयाच्या अस्सलपणाने मराठी कथासृष्टीत अमर केल्या. सर्व प्रकारची, विविध जातीजमातीची माणसे त्यांच्या कथेत येतात. उघड्यावर पडलेल्या बन्सीधरापासून मुक्याने मेलेल्या सावित्रीपासून, आंधळ्या रूढीचे बळी होऊन पुरंदर किल्ल्याच्या पायाभरणीत गाडल्या गेलेल्या नाथनाक देवकाईपासून ते तारळखोऱ्यातला पिऱ्या मांगापर्यंत नाना दु:ख भोगणारे उपेक्षित त्यांच्या लेखणीतून प्रकटले. त्या त्या माणसांचे चित्रण करताना लेंगऱ्याच्या माळावरील कातकऱ्यांच्या तळावर बन्सी उठून दिसतो. तर तारळखोऱ्यातील पिऱ्या व कृष्णाकाठचा रामवंशी कडेकपारी डोंगराच्या आश्रयाने राहतात पण माणुसकी, देवधर्म व आपला मनाचा भाविकपणा विसरत नाहीत.

माट्यांचे सर्व लिखाण प्रत्यक्षानुभवावर आधारित असल्यामुळे त्यांच्या लिखाणात सच्चेपणा व प्रत्ययपूर्णता आहे. त्यांच्या समाजशास्त्रीय अभ्यासानेच त्यांना प्रगल्भ अशी सामाजिक जाणीव दिली त्यामुळे उपेक्षितांच्या मनोवृत्तीचे सूक्ष्म निरीक्षण ते करू शकले. 'सामाजिक बांधिलकी हा शब्दप्रयोग माट्यांच्या काळी जन्माला आलेला नव्हता पण आपल्याला जे जे काही समाजहिताचं वाटतं ते ते लिहून प्रकट करायला आपण बांधील आहोत ह्या भावनेनं माट्यांनी लेखन केलं' [८] असे पु.ल.देशपांडे म्हणतात इतक्या विस्तृतपणे व सशक्तपणे ग्रामीणता मराठी कथेत माट्यांनी प्रथम आणली.

## ३)शिक्षणाने समाज सुधारेल ही श्रध्दा-

माटे मास्तर ज्या उपेक्षित समाजाविषयी लिहितात तो समाज शिक्षणाने सुधारेल यावर माट्यांची श्रध्दा आहे. हा विचार त्यांनी कथेतील पात्रांच्या तोंडी घातला आहे. तारळखोऱ्यातल्या पिऱ्याला जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा होते. तरी देखील जाताना तो चंद्रीला सांगून जातो,''तुला जो पोरगा हुईल त्येला लिवनं शिकव !''

'कशाचा संसार?' कथेतील तबाला आपल्या ओढगस्तीच्या परिस्थितीत शिक्षणाविषयी आस्था आहे. एक दोन विद्यार्थी बरोबर घेऊन येणाऱ्या माट्यांना तो आपल्या

अंगणात जागा देतो. एवढेच नव्हेतर श्रीगणेशापासून अक्षर ओळख करून घेऊन चारचौघात रामायण वाचायला येईपर्यंत तो स्वत:ची प्रगती करून घेतो. तर गणू हलवाई शाळेला जाणाऱ्या मुलांवर मनापासून प्रेम करतो. आपल्या मुलांनीही असेच शिकावे असे त्याला वाटते.

'शेवंतीचा खराटा' या कथेत ते स्वत:च या विषयी निवेदन करतात. शिक्षणाने शेवंतीची

नातवंडे स्वाभिमानाची भाषा शिकतील, जे अन्न शेवंतीला मिळाले नाही ते तिची नातवंडे खातील. ज्या दारापुढच्या केर शेवंती काढीत होती त्या हवेल्यात तिची नातवंडे राहतील. आज ही भविष्यवाणी खरी ठरली आहे.

४) लेखनशैली-

माट्यांना शैलीकार माटे असे म्हटले जाते. त्यांनी पारंपरिक वळणाचीच मराठी वापरली आहे. रूढ मराठीतीलच शब्द त्यांच्या भाषेत येतात. तिचे वळण घरगुती स्वरूपाचे आहे. आपण आपल्यासारखं असावं असं त्यांना वाटतं. पण काही संस्कृत शब्दही त्यांच्या भाषेत येतात. 'वाणीचा आदबशीर, मनाने सरळ आणि दिलाचा उदार असा हा गृहस्थ जन्माच्या मुद्यावर बाजूला पडला होता' या वाक्यात वाणी, गृहस्थ हे संस्कृत शब्द येतात.

या भाषेबरोबरच ग्रामीण भाषाही माट्यांच्या कथेत येते. ग्रामीण प्रसंग व वातावरण यानुसार ती बदलते. वातावरण, माणसांप्रमाणे भाषेचा ठसका व अर्थवाहीपणा बदलतो. रक्मीने विश्वासघात केला म्हणून सत्या पकडला गेला हे यल्ल्याच्या लक्षात येते. त्यासाठी 'कौसाळ' हा खास ग्रामीण शब्द आहे.

'सतीचे शस्त्र' या कथेत माट्यांच्या भाषेला एक वेगळेच तेज प्राप्त झालेले दिसते. बाळा गवंड्याची भाषा रंगेल व अस्सल ग्रामीण आहे. ग्रामीण भाषेतील रंगारानी, भानामती असे शब्द बाळा गवंड्याच्या तोंडी माट्यांनी घातले आहेत. तर सई मुडद्या, वडारा, बाळा गवंड्याचं ढ्यार फोडण्याची भाषा करते व त्याला अस्सल शिव्याही देते.

चित्रमयी शैली हे माट्यांच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य! दोन्ही कथा संग्रहात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील की त्यांनी केलेल्या वर्णनावरून चित्र काढता येईल. उदाहरणादाखल कृष्णाकाठचा रामवंशाचे देता येईल. त्यांनी केलेले वर्णन किती हुबेहुब आहे ते त्यांच्याच शब्दात पहा-

'अंगातील पैरण काढून आणि तांबड्या पट्टयाने कसलेला चोळणा मागे सारून तो बसलेला असल्याने त्याच्या देहाची शोभा स्पष्ट झालेली होती. तो बसलेला खडक जसा जमिनीपासून, तसे शौर्य आणि साहस यांचे वसतिस्थान जी त्याची छाती तिचे तकट वर उचलले होते ते पाहून त्याच्या सामर्थ्याची कल्पना कोणासही आली असती. काय असेल ते असो, पण या तरूण वयातच त्याच्या कपाळावरचे केस कानशिलाकडून मागे हटू लागले होते. न्हाव्याची आणि त्याची गाठ केव्हा पडते याचा छडा अजून तपास करणाऱ्यांनाही लागलेला नव्हता. मग मनगटासारख्या त्याच्या त्या जाड मिशा झुबकेदार असूनही आखल्यासारख्या दिसत. तिरप्या रोखाने वाढत जाऊन आणि वाटेत भेटणारे गालांवरचे केस सामील करून घेऊन त्या त्याच्या

कानांपर्यंत जाऊन पोहचल्या होत्या. डाव्या कानातील चोभ्यातून लोंबणारा त्याचा घेरदार बाळा कोठल्याही मानी स्त्रीने आपल्या नथीचा गाडा म्हणून योजिला असता. [९]

माट्यांचे हे दोन्ही कथासंग्रह सातारी बोलीतील व प्रादेशिक वातावरणाची साक्ष देतात. वाचकाला आपल्या पकडीत घेण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे.

'बन्सीधर ! तू आता कुठे रे जाशील या कथेत लेंगऱ्याच्या माळावर उभी असलेली गाढवे दिडक्या पायावर उभी आहेत. तळावर असणारी कुत्री वाळकी, चोपलेली आणि लांबोळी अशी विशेषणे देऊन माट्यांनी चित्रित केली आहेत. पोरांचा चिघोर, थोड्या अंतरावरचा झाडोरा, चित्ताचा कांदा उन्मळून येणे यासारखे शब्दप्रयोग खास सातारी बोलीची आठवण करून देतात.

'शाळेतले मास्तर खुर्चीच्या पाठीला रेलून आणि पायाची जुडी पुढे करून तमाखुची चिमुट तोंडात ओलवीत बसले होते' अशी वाक्यरचना माट्यांच्याच कथेत खास करून येते.

'कृष्णाकाठचा रामवंशी' कथेत माटे बाजारचे वर्णन करतात ते अगदी हुबेहुब आहे. कथांतील घटनांमध्येच नाट्य आहे. यातील बाजारचे वर्णन निवेदक आपल्या भाषेत करतो. सत्या बाजारावर धाड घालतो त्या धाडीतले नाट्य जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे राहते. ''इतक्या पूर्वेच्या कोपऱ्यातून धूम उठली. ''आला, आला, आला !'' एकदम कालवा माजला 'अरं !कोन आला ?' 'अरं सत्या आला !' शे सव्वाशे करोल रामोशी बेधडक बाजारात शिरला ! सर्वांच्या मध्यावर सत्या एखाद्या दीपमाळेसारखा उभा होता. 'सत्या' म्हणताच वाणीउदमी, जोंधळ्याचे ढीग अन् दुकाने टाक टाकून पळाले, भुकेलेल्यांना पळायची 'जर्वर' नव्हती, ''हतं का जीव जाईना'' असे जो तो म्हणू लागला. इतक्यात वाघासारखी गर्जना ऐकू आली. ''गोरगरिबांनू ! उचला ! उचला जुंदळा ! राती पोटभर भाकर खा.'' जीर्ण पोत्याच्या घड्याला काखेला घेऊन नाही तर जुने पंजी खांद्यावर टाकून रेंगाळत चाललेले दुबळे कु णबी एकदम सबळ झाले बायांनी सुध्दा आपल्या खाकुटीची कुबट फडकी पसरली; अन् एक घंटाभर लुटीची भयंकर धूम उडाली. ज्याला जेवढे घेता येईल तेवढे त्याने घेतले.'' [१०] हे प्रसंगातले नाट्या अधिक बोलके झालेले आहे.

## ५)सर्व जातीजमातीतील लोकांविषयी लेखन व कथांची विविधता-

माटे मास्तरांची माणुसकी एका विशिष्ट वर्गापुरती मर्यादीत नाही. ती सर्व जातीजमातीतील लोकांशी आपले नाते जोडते. मांग, रामोशी, महार, कुणबी, मुंबईतील असंख्य भिकारी, कामगार, ब्राह्मण या सर्वांशी माटे आपुलकीचे नाते जोडतात. त्यांच्या वागण्या बोलण्याची जाण त्यांना आहे. यामुळे अठरापगड जातीची माणसे त्यांच्या कथेत जिवंत होतात. 'माझे दहन तुम्ही करा' या कथेत कोकणातील नारोपंतांच्या घरचे ब्राह्मणी वातावरणाचे संस्कार, देवपूजा, नित्यकर्म यांना असणारे स्थान, नर्मदाबाईंचे जुन्याच संस्कारांना चिकटून राहणे हे सर्व एका बाजूला

तर धनजी हा पारशी गृहस्थ, त्याचा सच्चाईचा व्यवहार हे सर्व चित्रित करून तायडी व धनजी यांचे मिलन दर्शवून माट्यांनी दोन भिन्न संस्कृतीचा मिलाफ चित्रीत केला आहे. असे ब्राह्मणी संस्कृतीचे समर्थपणे वर्णन करणारे माटे 'तारळ खोऱ्यातील पिऱ्या' या कथेत चंद्री व पिऱ्या यांचे संवाद तितक्याच समर्थपणे लिहितात. अशी समाजातील सर्व थरांविषयी वाटणारी माणुसकी माट्यांना साहित्य निर्मितीला उपकारक ठरली आहे.

माट्यांच्या कथांच्या रचना साध्या असल्या तरी विविधता आहे. 'नाथनाक व देवकाई यांची काळझोप' ही रूद्रभिषण शोकांतिका आहे. तर 'कृष्णाकाठचा रामवंशी' व 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' या समान जातकुळीच्या आहेत. 'पुरंदरचा नामा' ही कथा किस्से वजा वाटली तरी शेवटी येणारी नामाची कहाणी मनात घर करून राहते. 'सावित्री मुक्यानेच मेली' ही देखील अविस्मरणीय शोकांतिकाच आहे. 'शंभू शिखरीचा राजा' ही शंकर व पार्वती या देशपांडे कुटुंबाच्या सच्चाईच्या विजयाची कथा आहे. 'माणुसकीचा गहिवर' ही चोरट्या प्रवृत्तीच्या माणसातही वात्सल्य व माणुसकी आहे हे दाखविणारी माणुसकीने ओथंबलेली कथा आहे.

माट्यांच्या कथेतील माणसे साधी आहेत. त्यांचे मनोव्यापार गुंतागुंतीचे नाहीत. ती सत्प्रवृत्त आहेत. सत्या रामोशी, पिऱ्या मांग खून करतात. पण हेच आपल्या वाट्याला यावे असे त्यांना वाटत नाही. ती दोघेही मानवी भावभावना जपतात. पिऱ्या खंडोबाच्या जत्रेची वाट पाहतो तर सत्या बाजारची लूट गरीबांसाठी करतो. तबाला वाटते आपल्याला व आपल्या बायकोला एकत्र काम मिळावे, सुखदु:खाच्या चार गोष्टी एकत्र बोलायला मिळाव्यात. रामभरोसी श्रीमंत हवेलीत राहूनही मनाने अस्वस्थ आहे. एक पगार मिळाला ना ? याखेरीज मालक आपली काहीच चौकशी करीत नाही याचे त्याला वाईट वाटते.

माट्यांची अनुभव घेण्याची पध्दती एकदम साधी आहे. ते नेहमीचे माटे मास्तर राहतात. कथेपासून अलग राहणे त्यांना जमत नाही. कथेत ते स्वत: भाष्य करतात. कथेत नेटकेपणा बांधेसूदपणा नसला तरी घटना व अनुभव इतके पिळदार असतात की कथा उठावदार होते. कथेला कथेच्या धाटणीने ते वाहू देत नाहीत. त्यांचे चिंतनशील व्यक्तिमत्व त्यातून व्यक्त होते. 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' या कथेत ते समाजस्तराचे वर्णन करतात. 'ज्या मानवी प्राण्यांनी हे खोरे भरून राहिले आहे त्याचे ही थर पाहण्यासारखे आहेत. मधून मधून एखादा दुसरा वरच्या पृष्ठावरचा खडा मुसलमानी आहे, त्याच्याखाली गुजर मारवाडी आहे. त्याच्याखाली चित्पावन ब्राह्मण आहे, त्याच्याखाली मराठा आहे, पुष्कळ खोल गेल्यावर कुणबी आहे, त्याच्याखाली मांग, रामोशी आहेत. समाजसरोवर काळसर गढूळ आहे. त्या प्राण्याला कसलाही 'प्रसाद' राहिलेला नाही, पण पाहणाऱ्याची दृष्टी 'प्रासादिक' असली तर नाना प्रकारचे जलचर वावरताना

त्याला तेथे दिसतात. जाता जाता दृष्टी तळाशी गेली म्हणजे भली दांडगी जड कासवे तळाशी बसलेली दिसू लागतात. एखाद्या वेळी एखादे खडबडून उठते आणि पाण्यात उरफाटा तीर मारून बिनदिक्कत झेपावत येते. त्याला पाहून सगळे प्राणी आणि सगळे जीव गलबलतात. पिऱ्या मांग अशा धाडशी प्राण्यांपैकीच एक होता. [११]

कोणत्याही कथेत माटे स्वत: आपली ओळख लपवत नाहीत. कारण तसा त्यांचा हेतू नाही. ते स्वत: समाज सुधारक असल्याने या जातीजमातींचे दारिद्र्य, लाचारी लोकांसमोर आणणे हाच त्यांचा उद्देश आहे. या साठीच ते कथा लेखनाकडे वळले.

## ५)वेधक कथाशिर्षके-

माट्यांनी आपल्या कथांना दिलेली शीर्षके वेधक आहेत. त्या नावातूनच कथेची मध्यवर्ती कल्पना लक्षात येते. 'सावित्री मुक्यानेच मेली' या कथेतून सावित्रीचा भावनिक कोंडमारा आपल्या लक्षात येतो. 'शंभू शिखरीचा राजा' या नावावरून डोंगरावरच्या शंभूला असलेले लोकांच्या जीवनातील स्थान स्पष्ट होते. तर 'कशाचा संसार?' या शीर्षकावरून तबाच्या दु:खपूर्ण जीवनाची कल्पना येते.

याखेरीज संत साहित्यावर लेखन केलेली माट्यांची शीर्षके माट्यांच्या बहुश्रुत व्यक्तिमत्वाची साक्ष देतात. 'भिवरेच्या तीरावरील दोन देव', 'नासलेले अमृत मधुर झाले', 'अजानवृक्षाच्या सावलीत' ही शीर्षके त्याचीच साक्ष देतात. ही माट्यांच्या लेखणीची करामत आहे.

## ६)श्री.म.माटे ग्रामीण कथेचे जनक-

सुखटणकर सरदेसाई यांच्यापेक्षा माट्यांची लेखन प्रेरणाच वेगळी आहे. मानवी जीवनाचा एक उपेक्षित स्तर त्यांना दिसला. त्या स्तराचे जीवन त्यांनी जवळून न्याहाळले. केवळ कोरडी सहानुभूती व्यक्त न करता ते माणुसकीच्या भावनेने तिकडे वळले. त्यांना माणसे जशी दिसली तशी ती त्यांनी आपल्या कथेतून व्यक्त केली. उपेक्षित जीवनातील घटना व त्या माणसांची मने ही अर्थपूर्ण होती. माटे पुढारी नव्हते किंवा समाजसुधारकाचा अभिनिवेशही त्यांनी कधी आणला नाही. लेखन करताना माट्यांना ती माणसे 'माणसे' म्हणूनच महत्वाची वाटली. माट्यांच्या कथेचा कसदारपणा मोठा ! मराठी कथेत त्यांनी माणुसकी आणली.

स्वतंत्र विचारसरणी, व्याकरणशुध्द भाषाशैली या गुणांमुळे मराठी साहित्यात माट्यांनी वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान निर्माण केले. कुठल्याही घटनेकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन स्वत:चा असतो. त्यांची स्वत:ची शैली असते. त्यामुळे त्यांचे लेखन विस्ताराने जास्त नसले तरी बहुमोल आहे.

माट्यांच्या सर्व कथांत सामाजिकतेचे नेटके भान आहे. उपेक्षित, कष्टकरी, स्त्री जीवनाविषयी त्यांना एक प्रकारची आत्मीयता वाटते. त्या जीवनाचा त्यांनी जवळून अभ्यास केला आहे, त्यांचे त्या

विषयीचे सूक्ष्म निरीक्षण आहे. त्या परिसरातील ती माणसे त्यामुळेच उठावदारपणे लक्षात राहण्याजोगी वाचकांसमोर येतात व कायमची लक्षात राहतात. मग तो तारळखोऱ्यातील पिऱ्या असो किंवा 'शंभू शिखरीचा राजा' मधील पार्वतीची व्यक्तिरेखा असो. त्यांच्या कथा वैशिष्ट्यपूर्ण होण्यामध्ये वातावरणाचे योगदान ही महत्वाचे आहे. 'नाथनाक व देवकाई यांची काळझोप' या कथेत त्यांनी ऐतिहासिकता जपली आहे. पण ऐतिहासिक वातावरण चित्रीत करणे हा त्यांचा उद्देश नाही. त्यांचे लक्ष आहे ते बहिरनाकच्या आत्यंतिक दारिद्र्यापोटी होणाऱ्या आगतिकत्वाकडे. माट्यांच्या ठायी पुरोगामी व उदारमतवादी दृष्टिकोन होता. त्यांच्या मुळाशी नुसतीच भावनात्मकता किंवा भावनात्मक कनवाळूपणा नव्हता तर त्याला एक निश्चित असे वैचारिक अधिष्ठान होते. त्यांच्या अनेक कथांमधून सामाजिक अन्याय, शोषण झालेले आशावादी मन चित्रीत झाले आहे. याचे उदाहरण 'शेवंतीचा खराटा' या शब्दचित्रात पहायला मिळते. माट्यांनी आपल्या कथेचे एकूण निवेदन प्रमाण भाषेत केले आहे. पण ग्रामीण व्यक्तींचे संवाद मात्र ग्रामीण भाषेतच आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेचे सौंदर्य कुठेही उणावलेले नाही.

जवा, न्याट, लोकांड, प्येटी, बलं, मुसुलमान, पावना, संपल्याबगार, त्येंच्या परीस इ. ग्रामीणतेचा प्रत्यय देणारी शब्दसामग्री त्यांच्या कथांमधून वापरली आहे. कथेतील चिम्या, तुळसी, पवळ्या, बेम्ट्या, यलाप्पा, सत्या, धोंड्या, नाम्या, पिऱ्या, सई, शिद्या, तानी, नाथनाक, बहिरनाक, सोयरा, संतु, धर्मा, शेवंती इ. व्यक्तींची नावे ही त्या परिसराचा आणि ग्रामीणतेचा प्रत्यय आणून देतात.

माट्यांचे वाङ्मय वाचले तर कोणत्याही व्यक्तीच्या अथवा मतप्रणालीच्या आहारी ते गेले नाहीत. केवळ लिहायचे म्हणून त्यांनी लिहिले नाही. तर त्यांना जे भावले ते त्यांनी शब्दबध्द केले. काहीतरी सांगायची तळमळ त्यांना लागून राहिली आहे. त्याचाच आविष्कार त्यांनी वाङ्मयात केला.

श्री.म.माट्यांचे दोन्ही कथा संग्रह 'उपेक्षितांचे अंतरंग' असो किंवा 'माणुसकीचा गहिवर' यातून उपेक्षित, कष्टकरी, माणुसकीला जगणाऱ्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन घडते. त्यांच्या बद्दल गंगाधर गाडगीळ म्हणतात ''असं हे माट्यांचं 'उपेक्षितांचं अंतरंग'. मराठी साहित्यात एक वेगळी वाट पाडणारं, अनुभवाचं एक वेगळंच विश्व साकार करणारं, बालबोध मराठमोळ्या घडणीतून अभिजात कलात्मकता साधणारं, अनुभवाचं मातीशी असणारं नातं मुठीत पकडणारं, साहित्यिक संकेतांशी फटकून राहणारं, आपण आपलं आपल्यासारखं असावं या वृत्तीतून निर्माण झालेलं !'' [१२] त्यांचा हा अभिप्राय सार्थ आहे.

श्री.म.माटे यांना ग्रामीण मराठी कथेचे जनक असे म्हटले जाते. १९४० साली माट्यांनी कथालेखनास सुरवात केली. आजपर्यंत मराठी साहित्यात कुठेच स्थान नसलेला उपेक्षित,

कष्टकरी, दलित वर्ग माट्यांच्या कथा साहित्यात प्रथम प्रकट झाला. त्या माणसांना माट्यांनी कथेचे नायक पद दिले.

समाजातील या उपेक्षित वर्गाविषयी त्यांना प्रेम जिव्हाळा वाटतो. त्या प्रेमामुळेच त्यांचे लेखन हृदयस्पर्शी उतरले आहे. त्यांच्या कथा वाङ्मयात उत्कट संवेदनशीलता, मानव्याची जाण आहे. 'शंभू शिखरीचा राजा', 'सावित्री मुक्यानेच मेली', 'कृष्णाकाठचा रामवंशी' ह्या सारख्या कथा श्रेष्ठ ठरल्या आहेत.

त्यांच्या संपूर्ण कथा सृष्टीतून मानवतेचा, माणुसकीचा झरा वाहताना दिसतो. त्यांच्या कथेतील माणसे माणुसकीचा धागा कुठेच विसरत नाहीत. मग ती कातकऱ्यांच्या तळावरील चिम्या तुळशी असोत किंवा दरोडेखोर वृत्तीचा सत्या असो. सर्वत्र सत्याची दहशत आहे पण त्याचा शाळेतील प्रवेश मुलांना पेढे व बर्फी वाटण्यासाठी आहे. साहित्यातून समाजमानस प्रकट होते, याचा खराखुरा प्रत्यय माट्यांच्या लेखनातून येतो. 'कशाचा संसार?' कथेतील तबा पत्नीच्या प्रेमळ सहवासाठी आतुरलेला आहे. तर 'अस्पृष्टाच्या डायरीतील पाने' मधील पिऱ्या सवर्णांचा हरकाम्या आहे. त्याला त्याचे नित्याचे विधी उरकायला देखील उसंत दिली जात नाही. त्याच्या मोबदल्याचा तर विचार सुध्दा होत नाही. उपेक्षित भाग्यविहीनांच्या जीवनाचे पहिले प्रभावी दर्शन माट्यांनी आपल्या लेखनात घडविले.

आचार्य अत्रे माट्यांचा उल्लेख 'शैलीकार माटे' असा करतात. त्यांनी आपल्या लेखनातून सातारा परिसर जिवंत केला. प्रादेशिक बोलीचा तर काही वेळी पात्रांच्या बोलीचा म्हणजेच महारी बोलीचा वापरही त्यांनी आपल्या लेखनात केला आहे. पण केवळ शैली हेच माट्यांचे बलस्थान नसून त्यांनी ज्या मराठी माणसाची कथा सांगितली त्यातल्या आशयाच्या सच्चेपणात माट्यांचे खरे बलस्थान आहे.

ग्रामीण कथा वाङ्मयात माट्यांचे सर्वोच्च स्थान आहे हे नाकारता येणार नाही. ज्यांचे चित्रण मराठी साहित्यात अजून व्हायचे होते असा फार मोठा समाज माट्यांच्या लिखाणाच्या रूपाने प्रकाशात आला. मराठीतील ग्रामीण कथा विस्तारण्यास माटे कारणीभूत झाले.

त्यांच्या लेखनात काही प्रमाणात दोषही आढळतात. पाल्हाळिकपणा, कथेत आपले स्वत:चे विचार व्यक्त केल्याने कथेत एकसंधपणा नाही हे दोष असले तरी भरपूर साहित्यगुण त्यांच्या साहित्यात असल्याने त्यांचे लेखन निरस वाटत नाही. त्यांच्या कथेबाबत डॉ. आनंद यादव म्हणतात, 'हरिभाऊ आपटे यांच्यापूर्वी मराठी कादंबरी अस्तित्वात असूनही आधुनिक मराठी कादंबरीचे जनकत्व हरिभाऊंच्याकडेच जाते; त्याच न्यायाने मराठी ग्रामीण कथेचे जनकत्व श्री.म.माटे यांच्याकडे जाते.' [१३] हे मान्य करावे लागेल.

- - - - -

# संदर्भ

१. माटे श्री.म. :उपेक्षितांचे अंतरंग.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९४१. पुनर्मुद्रण आठवे १९९७.
पृष्ठ क्रमांक ६२.

२.तत्रैव :पृष्ठ क्रमांक ७७-७८.

३.माटे श्री.म. :माणुसकीचा गहिवर.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९४९.
सहावी आवृत्ती. पृष्ठ क्रमांक ६०.

४.तत्रैव :पृष्ठ क्रमांक ८८.

५.उ.नि.१ :पृष्ठ क्रमांक ७५.

६.तत्रैव :पृष्ठ क्रमांक ४८.

७.उ.नि.३ :पृष्ठ क्रमांक १३२.

८.महाराष्ट्र टाईम्स :३१ ऑगस्ट १९८६ पृष्ठ क्रमांक १.

९.उ.नि.१ :पृष्ठ क्रमांक २०-२१.

१०.तत्रैव :पृष्ठ क्रमांक २६.

११.तत्रैव :पृष्ठ क्रमांक ४४.

१२.गाडगीळ गंगाधर :प्रतिभेच्या सहवासात.
सुपर्ण प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९८५.
पृष्ठ क्रमांक २४.

१३.यादव आनंद :ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि समस्या.
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. द्वितीयावृत्ती १९८४. पृष्ठ क्रमांक १४.